**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे शाखा**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-१७-२२ दिनांक – २२/०१/२०२२

# क्रेडीट कार्डद्वारे फसवणुक झालेल्या इसमाचे १,४७,२००/- रुपये परत मिळविण्यात सायबर गुन्हे शाखेस यश

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत भाईंदर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार यांचे स्टेट बँक ऑफ इंडीयाचे क्रेडीट कार्डवरुन ०१,४७,३६२/- रुपयाची फसवणुक झालेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे शाखा आवक अर्ज क्रमांक ४५९/२०२१ दिनांक २३/०९/२०२१ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.

नमुद तक्रारीचे चौकशी अनुषंगाने तात्काळ स्टेट बँक ऑफ इंडीया सोबत पत्रव्यवहार करुन संबधित तक्रारदार यांचे १,४७,३६२/- रुपये क्रेडीट कार्डवरुन UNSECURED MODE पध्दतीने झालेबाबतची माहिती संबंधित बँकेला कळविण्यात आलेली होती, त्यावरुन संबंधित बँकेने सदरची रक्कम पुन्हा तक्रारदार यांचे बँक खात्यावर वर्ग केलेली आहे.

सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, आपले बँक खात्यावरुन/क्रेडीट कार्डवरुन UNSECURED MODE (OTP Not Generated, Card Details/Bank Details not share to Anyone ) अशा प्रकारचे व्यवहाराबाबतची माहीती तात्काळ बँकेला कळवावी.

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोशि/१८१२ प्रविण आव्हाड, पोशि/२०७२ गणेश इलग,मपोशि/ पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---००---